वंचितच्या प्रस्तावाचा राऊतांकडून इन्कार
मविआच्या बैठकीत जागा वाटपावर चर्चा

■ मुंबई

मविआच्या आजच्या बैठकीत जागा वाटपावरील चर्चा पूर्ण झाल्याचे शिवसेना नेते संजय राऊत यांनी सांगितले. तसेच वंचितने २७ जागांचा प्रस्ताव दिल्याच्या वृत्ताचा त्यांनी इन्कार केला. वंचितने केवळ एका कागदावर जागाबाबत इच्छा व्यक्त केली असे राऊत यांनी सांगितले. तसेच पुढची बैठक आघाडीतील चारही प्रमुख नेत्यांमध्ये होईल आणि त्यानंतर संयुक्त पत्रकार परिषदेत जागा वाटप जाहीर केले जाईल असेही ते म्हणाले.

आज महाविकास आघाडीतील ठाकरे गट, शरद पवारांची राष्ट्रवादी, काँग्रेस, वंचित आघाडी, आणि आघाडीतील इतर पक्षांची मुंबईत बैठक झाली. या बैठकीत वंचितने २७ जागांचा प्रस्ताव दिल्याची बातमी होती तसेच जरांगेना उमेदवारी देण्याची वंचितने बैठकीत मागणी केल्याचीही चर्चा होती पण बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत यांनी सांगितले की, वंचित आघाडीने २७ जागांचा प्रस्ताव दिलेला नाही. तसेच जरांगेना उमेदवारी द्या असेही सांगितले नाही. आमची मतदार संघ निहाय चर्चा झाली आणि जागा वाटप ठरले. आता शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष, व प्रकाश आंबेडकर यांच्या बैठकीत जगा वाटपावर शिक्कामोर्तब होईल आणि त्यानंतर जागावाटप जाहीर करू. मात्र यापुढे जागावाटपासाठी आणखी बैठका होणार नाहीत. असे राऊतानी स्पष्ट केले.

बेकायदा नर्सिंग होमबाबत सरकारचे मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

■ मुंबई

बेकायदा नर्सिंग होमवर कारवाईचा बडगा उगारण्यास उदासिन असलेल्या राज्य सरकारने महाराष्ट्र क्लिनिकल आस्थापना (नोंदणी आणि नियमन) विधेयकाच्या सुधारित मसुद्यावर सरकारने अजून निर्णय घेतलेला नाही, अशी स्पष्ट कबुलीच सार्वजनिक आरोग्य विभागाने दिली. तसे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले.याची गंभीर दखल घेत न्यायालयाने याचिकाकर्त्याला प्रत्युत्तर सादर करण्यास मुभा दिली.

राज्यातील बेकायदा नर्सिंग होमविरोधात कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारने क्लिनिक आस्थापना कायदा लागू केला. या कायद्याची राज्यात अंमलबजावणी केली गेली नाही. राज्य सरकारने सहा वर्षापूवी नर्सिंग होमवर कारवाई करण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कायदा करणार असल्याची हमी दिली मात्र त्याची पूर्तता करण्यात आली नाही त्यामुळे बेकायदा नर्सिंग होमविरोधात कारवाई होत नसल्याचा आरोप करत ठाण्यातील अतुल भोसले यांनी ॲड. युवराज नरवणकर यांच्यामार्फत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

लाला लजपतराय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स
महालक्ष्मी, मुंबई- 400 034.
NAAC पुन्हा मान्यताप्राप्त 'A' ग्रेड, CGPA – 3.20 (जुलै 2023)
(अल्पसंख्याक महाविद्यालय)

शैक्षणिक वर्ष 2023-2024 पासून कनिष्ठ महाविद्यालयात खालील अध्यापन पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

(अनुदानित)

क्र.	विषय	पद	पदांची संख्या
1	इंग्रजी	शिक्षण सेवक	1 पूर्ण वेळ
2	वाणिज्य	शिक्षण सेवक	1 पूर्ण वेळ

महाविद्यालयाला अल्पसंख्याक दर्जा आहे.

वरील पोस्ट सर्वांसाठी खुल्या आहेत.

नियुक्त्या कार्यभाराच्या उपलब्धतेच्यानुसार आणि शिक्षण उपसंचालक कार्यालयाची मान्यतानुसार केल्या जातील. पात्रता आणि वेतन महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार असेल.

आधीपासून कार्यरत असलेल्या व्यक्तींनी त्यांचे अर्ज योग्य चॅनेलद्वारे पाठवले पाहिजेत आणि त्यांच्या सेवेतील ब्रेकसाठी उमेदवाराने स्पष्टीकरण दिले पाहिजे.

गुणपत्रिकांच्या स्वयं-साक्षांकित प्रतींद्वारे समर्थित तपशीलवार रेझ्युमेसह अर्ज प्राचार्य, लाला लजपतराय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, लाला लजपतराय मार्ग, महालक्ष्मी, मुंबई- ४०० ०३४ येथे पोहोचला पाहिजे.

तुमचा अर्ज जाहिरातीच्या तारखेपासून १० दिवसांच्या आत पाठवा.
ईमेल: principal.llc@gmail.com

सही/-
प्राचार्य

फॉर्म जी
अर्शिया नॉर्थन एफटीडब्ल्यूझेड लिमिटेड करिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
उत्तर भारतामध्ये वेअरहाऊसींग आणि लॉजीस्टीक्स क्षेत्रामध्ये कार्यरत
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए उप विनियमन (१) अंतर्गत)

प्रस्तुत तपशील

१.	पॅन आणि सीआयएन/एलएलपी क्र. सह कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	अर्शिया नॉर्दन एफटीडब्ल्यूझेड लिमिटेड पॅन : AHCA 1821D सीआयएन : U51109MH2008PLC183555
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	२०५ आणि २०६ (पार्ट), २ रा मजला, सीजे हाऊस, एफ-ब्लॉक, शिव सागर इस्टेट, डॉ. ॲनी बेसंट रोड, वरळी, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००१८
३.	संकेतस्थळाचा यूआरएल	Http://www.arshiyalimited.com/free-trade-and-warehousing-zones.html
४.	जेथे बहुसंख्य स्थावर मालमत्ता स्थित आहे त्या स्थळाचा तपशील	गाव - इब्राहीमपुर, जिल्हा-बुलंद शहर, खुरजा - २०३१३१, उत्तर प्रदेश (०९), भारत.
५.	मुख्य उत्पादन / सेवांच्या क्षमतेची स्थापना	* ''मल्टी सेक्टर सेझ'' ची १२७.११ एकर अधिसूचित जमीन. * ४.४० एकरवर बांधलेले ३ बेअरहाऊसेस
६.	मागील वित्तीय वर्षामध्ये विक्री केलेल्या मुख्य उत्पादन / सेवांचे परिमाण आणि मूल्य	वि. व. २०२२-२३ च्या वित्तीय अहवालानुसार एकूण महसूल भा. रु. ४.९६ कोटी होता.
७.	कर्मचारी / कार्मिकांची संख्या	३१ डिसेंबर, २०२३ अनुसार, कॉर्पोरेट ऋणकोकडे १२ कर्मचारी/कामगार आहेत. सीडीकडे कंत्राट आधारावरील मनुष्यबळही आहे.
८.	अंतिम उपलब्ध दोन वर्षांचा वित्तीय अहवाल (परिशिष्टासह), क्रेडिटर्सची यादी, उपलब्ध असलेल्या प्रक्रियांच्या नंतरच्या घटनांचा संबंधित तपशिल समवेत अधिक तपशील	cirparshiya@gmail.com येथे इमेल पाठवून आवश्यक तपशील प्राप्त करू शकतात
९.	संहितेच्या सेक्शन २५ (२)(एच) अंतर्गत विभेदन अर्जदारांची पात्रता. यूआरएल येथे उपलब्ध आहेत.	विभेदन अर्जदार, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या सेक्शन २९ए अंतर्गत पात्र असणे आवश्यक. cirparshiya@gmail.com येथे इमेल पाठवून आवश्यक तपशील प्राप्त करू शकतात
१०.	स्वारस्यची अभिव्यक्ती स्वीकारण्याची अंतिम तारीख	१५ मार्च, २०२४
११.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांची तात्पुर्ती यादी वितरणाची तारीख	१७ मार्च, २०२४
१२.	तात्पूर्त्या यादीला हरकती सादर करण्याची अंतिम तारीख	२२ मार्च, २०२४
१३.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांची अंतिम यादी वितरणाची तारीख	२३ मार्च, २०२४
१४.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रीक्स आणि विभेदन योजनेची विनंती वितरणाची तारीख	२३ मार्च, २०२४
१५.	विभेदन योजना सादर करण्याची अंतिम तारीख	२२ एप्रिल, २०२४
१६.	स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी इमेल आयडी प्रक्रिया करा	cirparshiya@gmail.com
१७.	मुळ दस्तावेज सादर करण्याचा पत्ता	प्राईसवॉटरहाऊस कुपर्स प्रा. लि. २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००२८.

टिप : * समयसीमा, एनसीएलटीद्वारे अनुदानित सीआयआरपी समयसीमेच्या विस्ताराच्या मंजुरीला अधीन आहेत.

भुवन मदन
अर्शिया नॉर्थन एफटीडब्ल्यूझेड लिमिटेडचे विभेदन व्यवसायिक
दिनांक : २९ फेब्रुवारी, २०२४
नवी दिल्ली
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBB/IPA-001/IP-P01004/2017-2018/11655
एएफए : AA1/11655/02/241224/106721 पर्यंत वैध : २४/१२/२०२४
आरपी कार्यालयाचा पत्ता : सीजीएच २१२, डीएलएफ कॅपिटल ग्रीन, मोती नगर, दिल्ली - ११००१५
संपर्कासाठी ईमेल आयडी : cirparshiya@gmail.com
आधारभूत आयपीई : पीडब्ल्यूसी कॉर्पोरेट बिजनेस सर्विसेस एलएलपी

फॉर्म ए जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

चिंतामणीज ज्वेलरी आर्केड प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	चिंतामणीज ज्वेलरी आर्केड प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	१६.०१.२००३
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक - मुंबई
४.	कॉर्पोरेट ओळख क्र.	U36910MH2003PTC138711
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता	नोंद. पत्ताः सुरज व्हिस्टा, ३ रा मजला, काशिनाथ भुरुड मार्ग, प्रभादेवी दादर पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२८.
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	२३.०२.२०२४ (आदेश दि. २८.०२.२०२४ रोजी प्राप्त)
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	२१.०८.२०२४ (दि. २३.०२.२०२४ पासून १८० दिवस)
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	नावः श्री. प्रशांत जैन नोंदणी क्र. IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	नोंद. पत्ताः ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९बी/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे, ठाणे, नवी मुंबई-४००७०९. ईमेल : ipprashantjain@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासोबत पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल, दिलेल्या पत्यापेक्षा वेगळा असल्यास.	द्वारा स्सार्वी रिझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी पत्ताः बी-६१०, बीएसईएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्टेशनसमोर, नवी मुंबई - ४००७०३. वेबसाईटः www.ssarvi.com ईमेल : chintamanis.cirp@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	१३.०३.२०२४ (२८.०२.२०२४ पासून १४ दिवस)
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २९ च्या उप-कलम (६ए) च्या खंड (ब) अन्वये धनकोंचे वर्ग, जर असल्यास.	लागू नाही
१३.	वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गातील तीन नावे)	लागू नाही
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः	https://www.ibbi.gov.in/home/downloads लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी चिंतामणीज ज्वेलरी आर्केड प्रायव्हेट लिमिटेडची दि. २३.०२.२०२४ रोजी कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
चिंतामणीज ज्वेलरी आर्केड प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १३.०३.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
श्री. प्रशांत जैन
दिनांकः २९.०२.२०२४ नोंदणी क्रमांक - IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
ठिकाणः मुंबई चिंतामणीज ज्वेलरी आर्केड प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात अंतरिम ठराव व्यावसायिक

मुंबई येथील लघु वाद न्यायालयामध्ये
(वांद्रे शाखा)
आर.ए.ई. आणि आर. दावा क्र. ६१३/२०१८

१. रामकुमार जलान सार्वजनिक धर्मादाय न्यास
भारतीय सार्वजनिक न्यास, १८९० अंतर्गत
योग्यरित्या नोंदणीकृत, पत्ताः ३५, बॉम्बे टॉकीज कंपाऊंड, हरून खान रोड, मालाड (पश्चिम), मुंबई - ६४.
२. श्री. रविंद्र कुमार लोकनाथ जलान
वयः ६६ वर्षे, पुरुष, ज्येष्ठ नागरिक
मुंबई येथील भारतीय निवासी, पेशाः व्यवसाय
३. श्री. गौरव अशोक जलान
वयः ४५ वर्षे, पुरुष, ज्येष्ठ नागरिक,
मुंबई येथील भारतीय निवासी, पेशाः व्यवसाय
४. श्री. संजिव ललिताप्रसाद गोयंका,
वयः ५९ वर्षे, पुरुष, ज्येष्ठ नागरिक,
कोलकाता येथील भारतीय निवासी, पेशाः व्यवसाय
अर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदार क्र. १ उपरोल्लेखित न्यास, ३५, बॉम्बे टॉकीज कंपाऊंड, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४ चे विश्वस्त आहेत. ... अर्जदार

विरुद्ध

१. मे. योगी केमिकल वर्क्स
द्वारा - प्रोप्रायटर श्री. संदीप छगनलाल छेडा, पुरुष, सज्ञान मुंबई येथील भारतीय निवासी
पेशाः व्यवसाय, शेड क्र. २४१, तळमजला, बॉम्बे टॉकीज कंपाऊंड, हिमांशू राय रोड, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ येथे व्यवसाय करीत आहे/ फॅक्टरी चालवीत आहे.
राहणार - सदनिका क्र. ३०९, 'ई' विंग, गुरु नानक बिल्डींग, महादेव मंदिरासमोर, शंकर लेन, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७.
२. मे. जलाराम इंडस्ट्रीज
द्वारा प्रोप्रायटर श्री. अशोक रमणलाल पांचाळ पुरुष, सज्ञान, मुंबई येथील भारतीय निवासी
पेशाः व्यवसाय, शेड क्र. २४१, तळमजला, बॉम्बे टॉकीज कंपाऊंड, हिमांशू राय रोड, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ येथे बेकायदेशीररित्या ताबा आणि व्यवसाय करीत आहे. ... प्रतिवादी

प्रति,
उपरोल्लेखित प्रतिवादी क्र. १,

ज्याअर्थी, वरील उल्लेखित अर्जदाराने प्रतिवादीविरुद्ध दावा दाखल करुन विनंती केली आहे की, सदर माननीय न्यायालयाने कृपया महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९च्या कलम १६(१)(ई) आणि/ किंवा कलम १६(१)(एन) नुसार प्रत्येक प्रतिवादीस त्यांच्या वस्तू आणि यंत्रसामगी हटवून दावा केलेली जागा म्हणजेच बॉम्बे टॉकीज कंपाऊंड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ येथे स्थित शेड क्र. २४१, तळमजला, क्षेत्रफळ ७१५ चौ.फू. रिक्त करण्याचे आणि अर्जदारांना शांततापूर्ण ताबा हस्तांतरित करण्याचे निर्देश देणारा आणि अशा इतर आणि पुढील दिलाशांकरिता आदेश आणि हुकूम पारित करावा
तुम्हाला याद्वारे समन्स जारी केल्यापासून ३० दिवसांच्या आत तुमचे लेखी उत्तर दाखल करण्याचे आणि न्यायालय कक्ष क्र. ३६, ६ वा मजला, लघु वाद न्यायालय, अनंत काणेकर मार्ग, भास्कर बिल्डींग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ मध्ये पीठासीन माननीय न्यायाधिशांसमक्ष व्यक्तिशः किंवा योग्य सूचना दिलेल्या आणि दाव्याशी संबंधित सर्व भौतिक प्रश्नांची उत्तरे देण्यास सक्षम किंवा ज्याच्यासोबत अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारा अन्य कोणी व्यक्ती असेल अशा अधिकृत वकिलामार्फत दि. ०२ मार्च, २०२४ रोजी दु. २.४५ वा. उपस्थित राहण्याचे आणि उपरोल्लेखित अर्जदारास उत्तरे देण्याकरिता न्यायालय कक्ष क्र. ३६ समक्ष उपस्थित राहण्याचे समन्स देण्यात येत आहे, आणि तुमच्या उपस्थितीकरिता निश्चित केलेला दिवस हा दाव्याच्या अंतिम सुनावणीकरिता नियुक्त केलेला असल्याने, तुम्ही त्या दिवशी तुमचे सर्व साक्षीदार सादर करण्यास तयार असावे आणि तुम्ही तुमच्या बचावाच्या समर्थनार्थ अवलंबून असलेली कोणतीही कागदपत्रे तुमच्यासोबत किंवा तुमच्या वकिलाद्वारे आणावी आणि तुम्ही याद्वारे नोंद घेणे आवश्यक आहे की, लेखी उत्तर दाखल न केल्यास, किंवा वर उल्लेखिलेल्या दिवशी तुमची उपस्थिती नसल्यास, दाव्याची तुमच्या अनुपस्थितीमध्ये सुनावणी आणि निकाली काढण्यात येईल.
सदर दाव्याची प्रत तुम्ही या न्यायालयाच्या न्यायालय कक्ष क्र. ३६ येथून प्राप्त करु शकता.

न्यायालयाच्या शिक्क्यानिशी पारित
दि. ४ मार्च, २०२३.
शिक्का
सही/-
(आर. के. कुलकर्णी)
अतिरिक्त निबंधक
ठिकाणः मुंबई
दिनांकः २६.०२.२०२४

विमानतळाजवळ अनधिकृत बांधकामे
हायकोर्टाने केंद्र सरकारला फटकारले

■ मुंबई,

पुणे जिल्ह्यातील लोहगाव विमानतळ परिसरातील बेकायदा बांधकामांकडे लक्ष वेधणाऱ्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने कारणे कसली सांगता, तुम्हाला सुरक्षेचे गांभीर्य नाही का? अशा शब्दात केंद्र सरकारचे कान उपटले. तसेच वेळेत प्रतिज्ञापत्र सादर करून भूमिका स्पष्ट करा अशी तंबीही खंडपीठाने केंद्र सरकार आणि संरक्षण विभागाला दिली.

पुण्यातील रहिवासी मंजिंदरजीत सिंग यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर बुधवारी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यातर्फे ॲड. सलील रे यांनी, तर केंद्र सरकारतर्फे ॲड. योगेश भाटे यांनी बाजू मांडली यावेळी वैयक्तिक किंवा इतर कुठलीही कारणे सांगून प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात वेळकाढूपणा कराल, तर ते सहन करणार नाही, अशी ताकीद न्यायालयाने दिली. याप्रकरणी २० मार्चला पुढील सुनावणी होणार आहे.

उत्तर प्रदेश पोलीस भरती पेपर फुटीसंदर्भात काँग्रेसची निदर्शने

■ लखनौ

उत्तर प्रदेश पोलीस भरती प्रक्रियेत झालेले पेपर फुटीच्या प्रकरणी आज काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना परीक्षा दिलेल्या उमेदवारांच्या बरोबर आंदोलन केले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी आज लखनौ व प्रयागराज इथे ही निदर्शने केले. यावेळी योगी सरकारच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.

उत्तर प्रदेशात या महिन्याच्या १७ व १८ फेब्रुवारी रोजी पोलीस शिपाई पदासाठीची प्रवेश परीक्षा घेण्यात येणार होती. मात्र त्या आधीच या परीक्षेचा पेपर फुटल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले. फुटलेल्या पेपरचे मोठ्या प्रमाणात वितरणही करण्यात आले होते. त्यामुळे अभ्यास करुन परीक्षा देणाऱ्या उमेदवारांमध्ये नैराश्य आले होते. या प्रकरणातील तथ्य जाणून घेतल्यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ही संपूर्ण परीक्षाच रद्द करुन पुन्हा एकदा परीक्षा घेण्यात येईल अशी घोषणा केली होती.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान या प्रकरणावरून राज्य शासनावर टीका केली होती. त्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते हे आक्रमक झाले असून त्यांनी आज जागोजागी निदर्शने केली. यावेळी परीक्षा दिलेले उमेदवारीही मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. पोलीस भरती पेपरफुटी प्रकरणी योगी सरकारने मोठी कारवाई केली आहे. पोलीस आणि एसटीएफने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये छापे टाकून ३९१ आरोपींना अटक केली. यावेळी मोठ्या प्रमाणात संशयितांची चौकशी करण्यात येत आहे.

फॉर्म जी
महाराष्ट्र येथे ट्रेडींग व्यवसायामध्ये कार्यरत
बीएसएफसी डिस्ट्रिब्यूटर्स प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन / सीआयएन / एलएलपी क्र.	बीएसएफसी डिस्ट्रिब्यूटर्स प्रायव्हेट लिमिटेड सीआयएनः U51109MH2013PTC245727
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	युनिट क्र. २१, ४ था मजला, एअर कंडिशन्ड मार्केट बिल्डींग, मालविय मार्ग, ताडदेव मुख्य रस्ता, मुंबई, मुंबई शहर महा. ४०००३४.
३.	वेबसाईटचे यूआरएल	उपलब्ध नाही
४.	बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील	कॉर्पोरेट ऋणकोमध्ये कोणतीही अचल संपत्ती नाही.
५.	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता	कंपनीमध्ये कोणतेही प्रचालन नाही.
६.	गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे परिमाण आणि मूल्य	वित्तीय वर्ष २०२२-२०२३ करिता वित्तीय विवरणपत्रामध्ये कॉर्पोरेट ऋणकोचा महसूल रु. १००.८२ लाख आहे.
७.	कर्मचारी/कामगारांची संख्या	शुन्य
८.	गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, त्यानंतरच्या प्रक्रियेच्या घटनांच्या संबंधित तारखा समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असण्याचे ठिकाणः	तपशिलाकरिता, कृपया cirp.bsfcdistributors@gmail.com येथे संपर्क साधावा.
९.	संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असण्याचे ठिकाणः	तपशीलवार ईओआय आणि पात्रता निकषाकरिता, कृपया cirp.bsfcdistributors@gmail.com येथे ईमेल पाठवावा.
१०.	स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक	१५ मार्च, २०२४
११.	संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक	२५ मार्च, २०२४
१२.	तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक	३० मार्च, २०२४
१३	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक	९ एप्रिल, २०२४
१४	संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक	१४ एप्रिल, २०२४
१५	ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक	१४ मे, २०२४
१६.	ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी	cirp.bsfcdistributors@gmail.com

श्री. एस. गोपालक्रिष्णन, ठराव व्यावसायिक
बीएसएफसी डिस्ट्रिब्यूटर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणी क्रमांकः IBBI/IPA-002/IP-N00151/2017-18/10398
आयबीबीआय नोंदणी पत्ताः २०३, दि घाटकोपर निळकंठ सीएचएस, जेठाभाई लेन, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७७.
दिनांकः २९ फेब्रुवारी, २०२४
ठिकाणः मुंबई

फॉर्म जी
नॉर्थ अमेरिकन मर्कंटाईल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड करिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक आणि टेक्स्टाईल वस्तूंच्या व्यापाराच्या उद्योगामध्ये कार्यरत
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अंतर्गत)

प्रस्तुत तपशील

१.	पॅन, सीआयएन, एलएलपी क्र. सह कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	नॉर्थ अमेरिकन मर्कंटाईल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन : U51505MH2002PTC134513 पॅन : AABCN4588I.
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	कॉर्पोरेट ऋणकोचे कार्यालय :- गाळा क्र. १२, जमनादास इंडस्ट्रीयल इस्टेट, जवाहर टॉकीजच्या समोर, मुलुंड -पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र - ४०००८०.
३.	संकेतस्थळाचा यूआरएल	उपलब्ध नाही
४.	जेथे बहुसंख्य स्थावर मालमत्ता स्थित आहे त्या स्थळाचा तपशील	मुंबई
५.	मुख्य उत्पादन / सेवांच्या क्षमतेची स्थापना	माहिती उपलब्ध नाही
६.	मागील वित्तीय वर्षामध्ये विक्री केलेल्या मुख्य उत्पादन / सेवांचे परिमाण आणि मूल्य	परिमाणावरील माहिती उपलब्ध नाही. वि. वर्ष २०२२-२३ च्या लेखापरीक्षीत वित्तीय अहवालानुसार कॉर्पोरेट ऋणकोने प्रचालनामधून कोणताही महसूल प्राप्त केलेला नाही (अन्य उत्पादन रु.२७३.००) चा महसूल मिळवला. चालू वित्तीय वर्षाचे वित्तीय अहवाल उपलब्ध नाहीत.
७.	कर्मचारी / कार्मिकांची संख्या	निरंक
८.	अंतिम उपलब्ध दोन वर्षांचा वित्तीय अहवाल (परिशिष्टासह), क्रेडिटर्सची यादी, उपलब्ध असलेल्या प्रक्रियांच्या नंतरच्या घटनांचा संबंधीत तपशिल समवेत अधिक तपशील,	cirp.namipl@gmail.com येथे इमेल पाठवून आवश्यक तपशील प्राप्त करू शकतात
९.	संहितेच्या सेक्शन २५ (२)(एच) अंतर्गत विभेदन अर्जदारांची पात्रता.	cirp.namipl@gmail.com येथे इमेल पाठवून आवश्यक तपशील प्राप्त करू शकतात
१०.	स्वारस्यची अभिव्यक्ती स्वीकारण्याची अंतिम तारीख	१५.०३.२०२४
११.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांची तात्पूर्ती यादी वितरणाची तारीख	२५.०३.२०२४
१२.	तात्पूर्त्या यादीला हरकती सादर करण्याची अंतिम तारीख	३०.०३.२०२४
१३.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांची अंतिम यादी वितरणाची तारीख	०९.०४.२०२४
१४.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रीक्स आणि विभेदन योजनेची विनंती वितरणाची तारीख	१४.०४.२०२४
१५.	विभेदन योजना सादर करण्याची अंतिम तारीख	१४.०५.२०२४
१६.	स्वास्थ्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी इमेल आयडी प्रक्रिया करा	cirp.namipl@gmail.com

सही/-
मिस कनक जानी
नॉर्थ अमेरिकन मर्कंटाईल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे विभेदन व्यवसायिक
आयपी नोंद. क्र.: IBB/IPA-001/IP-P-01757/2019-2020/12685
नोंद. पत्ता : १७, साई मोरेश्वर लक्झरीया, प्लॉट क्र. ७४, सेक्टर १८, खारघर, संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या पुढे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४१०२१०
दिनांक : २९.०२.२०२४
स्थळ : मुंबई
एएफए वैध दिनांक : १९-१२-२०२४
ईमेल आयडी : cirp.namipl@gmail.com

झारखंडच्या जामतारात रेल्वे अपघात! १२ ठार

■ राची

झारखंडमधील जामतारा येथे रेल्वेचा भीषण अपघात झाला. या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण गंभीररित्या जखमी झाले आहेत. घटनास्थळी पोलीस आणि प्रशासनाची एक टीम दाखल झाली आहे. बचावकार्य सुरू करण्यात आले. ही घटना करमाटांड जवळ कालाझरिया येथे घडली आहे. ए